# क्रोन डिसीज आणि अल्सरेटीव कोलायटीस

**क्रोन डिसीज-** क्रोन डिसीज या आजारात पचन संस्थेतील अवयवांचा दाह होतो क्रोन डिसीज मध्ये आतडयाच्या आतील अस्तरास दाह होतो क्रोन डिसीज मुळे तोंड,अन्ननलिका आणि जठराच्या आतील अस्तरासही बाधा होऊ शकते.

**क्रोन डिसीजची कारणे-** क्रोन डिसीज कशामुळे होतो त्याची कारणे माहित नाहीत, परंतु कुटुंबात कोणाला हा आजार असल्यास त्याची शक्यता वाढते. अन्नमार्गातील जीवाणू किंवा विषाणूस प्रतिकारशक्तीद्वारे अधिक प्रतिसाद दिला जाऊन दाह निर्माण होतो आणि जखम होते. धुम्रपानाने क्रोन डिसीजचा धोका वाढतो.

**क्रोन डिसीजच्या खुणा आणि लक्षणे-**

सर्वसाधारणपणे नेहमी आढळणा-या खुणा आणि लक्षणे पुढीलप्रमाणे-

- पोटाच्या उजव्या बाजूस खाली पेटके येऊन वेदना होणे
- अतिसाराचा रंग काळा किंवा गडद असणे किंवा रक्त पडणे.
- ताप
- नेहमीपेक्षा अधिक थकवा येणे
- भूक मंदावणे
- आपोआप वजन कमी होणे किंवा बालकांची वाढ मंदावणे
- मळमळ




**उपाय-**

अन्नमार्गाचा दाह कमी करण्यासाठी औषधांचा वापर करता येतो. जीवाणू संसर्गावर उपचार करण्यासाठी किंवा त्यास प्रतिरोध निर्माण करण्यासाठी प्रतिजैविकांचा वापर करावा आणि अतिसार रोखण्यासाठी योग्य औषधांचा वापर करावा. प्रतिकारशक्तीचा प्रभाव कमी करण्यासाठी योग्य त्या (immune suppressants) औषधांचा वापर करावा.

- नॉन स्टीरॉयडल ॲन्टी इनल्फेमेंटरी ड्रग वेदनामुक्त होतात. संसर्ग कमी होतो आणि ताप कमी करतात.
- ॲन्टी इनफ्लेमेंटरी -
  सांधे आणि उतींमधील दाह किंवा सूज कमी करतात.
- स्टीरॉईड-
  या प्रकारची औषधे बदल घडवून आणतात किंवा संप्रेरक सदृश्य परिणाम करतात, दाह कमी करतात किंवा उतींची वाढ व दुरुस्ती करतात.
- प्रतिकारशक्तीचे कार्य प्रभाव कमी करणारी औषधे-
  प्रतिकारशक्तीचा प्रतिसाद कमी करतात
- जीवनसत्वे-

शरीरातील सामान्य क्रिया सुरळित पार पाडण्यासाठी, वाढीसाठी आणि विकासासाठी मदत करतात.

- प्रतिजैविके-
  जीवाणूंची वाढ रोखतात किंवा त्यांना मारतात
- शस्त्रक्रिया-
  अन्नमार्गातील अडथळे दूर करण्यासाठी किंवा रक्तस्त्राव रोखण्यासाठी आणि आजाराची इतर लक्षणे कमी करण्यासाठी शस्त्रक्रियेची आवश्यकता असू शकते. आरोग्य विशेषज्ञ खराब झालेला आतडयाचा भाग काढून टाकतील व उर्वरित चांगले भाग पुनश्च जोडतील कदाचित कोलोस्टॉमी म्हणजे उदरपोकळीची पुढची भिंत आणि मोठे आतडे यामध्ये शस्त्रक्रियेने तात्पुरती जागा करतील किंवा कायमची वाट करुन देतील.

## अल्सरेटिव कोलायटीस

**अल्सरेटिव कोलायटीस** -(मोठया आतडयास व्रणकारी सूज) अल्सरेटिव कोलायटीस म्हणजे मोठया आतडयास आलेली सूज आणि त्याचा शोध होय. बृहदांत्रशोथ हा व्रणामुळे किंव प्रतिकारशक्तीतील बिघाडामुळे ही होऊ शकतो. जीवाणू विषाणू किंवा परापजीवी यांच्यामुळेही कोलायटीस होऊ शकतो. परंतू त्याची कारणे माहित नाहीत.

**लक्षणे-** अतिसार, पोटात वेदना, ताप आणि संडासवाटे रकत किंवा श्लेष्माळ त्वचा पडणे.

**औषधे**-बृहदांत्राचा दाह कमी करण्यासाठी आणि अतिसाराचा उपचार करण्यासाठी औषधे दिली जातात.

**लक्षणांचे व्यवस्थापन-**

- सुचविल्यानुसार द्रवपदार्थांचे सेवन करा. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होण्याचा धोका टळेल. त्यासाठी पाणी, ज्यूस किंवा दोन्ही घ्यावे. दररोज किती द्रवपदार्थ घ्यावे त्याची सूचना मिळेल शरीरातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी ORS घ्यावे यामध्ये पाणी, साखर आणि मीठ यांचे मिश्रण असते जे शरीरातील पाण्याची पातळी नियंत्रित राखतात व अतिसारामुळे खाली गेलेली पातळी वाढते.
- विविध प्रकारचा सकस आहार घ्यावा. त्यामध्ये फळे ,भाज्या अखंड धान्यापासून तयार केलेला ब्रेड शेंगभाज्या कमी स्निग्धांश असलली दुग्धोत्पादने, जनावरांचे मांस आणि मासे इ. समावेश होतो. एकाचवेळी भरपेट जेवण्यापेक्षा थोडया थोडया वेळाने काहीतरी खावे.
  मसालेदार पदार्थ, कॉफी , चॉकलेट आणि जास्त स्निग्धांश असलेले पदार्थ टाळावेत.




Reference : Micromedex online solution